# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १३/०५/२०२२ (शुक्रवार)**

**(दुपार)**

---

### विनयभंग

**पो.स्टे. काटोल** :– दिनांक १२/०५/२०२२ चे १२.३० वा. ते १३.०० वा. दरम्यान अल्पवयीन फिर्यादी/पीडित वय १६ वर्ष ही क्लासेस करीता गेली होती. क्लास करून घरी परत जाण्यासाठी काटोल बस स्टॉप वर बसची वाट पाहत असता तिचा गावातील मित्र आरोपी नामे– विकास दयाराम काकडे वय २४ वर्ष, रा.भिष्णुर हा आला व 'तु माझ्शी का बोलत नाही, फोन का करत नाही, जर तु माझ्शी बोलली नाहीस व लग्न केले नाहीस तर तुला पळवुन नेईल नाहीतर जिवाने मारून टाकील' असे म्हणुन ती बसमध्ये बसण्याकरिता जात असता आरोपीने पीडितेस मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ (अ)(ड), ५०६ भादंवी. सहकलम ८, १२ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली आहे. गुन्हयाचा पुढील तपास मउपोनि पाथोडे मो.नं. ७८७५५८५१२५ हे करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**१) पो.स्टे. खापरखेडा** – दिनांक ११/०५/२०२२ चे ११.०० वा. ते ११.१५ वा. चे सुमारास पो.स्टे. खापरखेडा हद्यीत फिर्यादी यांची १७ वर्षीय ११ महिने अल्पवयीन मुलगी हीला आरोपी नामे– विशाल ढोढलमल याने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून तिला पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक श्री दिपक कांक्रेटवार मो.क्र. ८३२९६६६७८ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. जलालखेडा** – दिनांक १२/०५/२०२२ चे १०.०० वा. चे सुमारास पो.स्टे. जलालखेडा हद्यीत फिर्यादी यांची १६ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही संगणक क्लासेस करीता जातो म्हणुन घरून निघुन गेली ती परत आली नाही. फिर्यादीने मुलीचा गावात शोध घेतला असता ती मिळून आली नाही. अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून तिला पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक पोलीस निरीक्षक मनोज चौधरी मो.क्र. ८९७५७५५९६९ हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

**पो.स्टे. मौदा :–** अंतर्गत १६ कि.मी. अंतरावरील मौजा तेली मांगली येथे दिनांक ०९/०५/२०२२ चे १३.३० वा. दरम्यान **सौ रत्ना ईश्वर नेवारे वय ४५ वर्ष, रा. तेली मांगली** हिचे दोन दिवसा अगोदर तिचे पती सोबत घरगुती कारणावरून तोंडातोंडी झाल्याने तिने घरी पिकावर फवारणी करण्याचे विशारी औषध प्राशन केले. त्यामुळे तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचारकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि ०९/०५/२०२२ रोजी ०५.०४ वा. भरती केले असता उपचारा दरम्याण पावली.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक राजु तायडे यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम १७४ जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार यंगलवार मो.क्र. ९४२३२१९४२९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**